संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ
अमरावती – ४४४ ६०२
(महाराष्ट्र)

✆ : २६६२२०६, २६६२२०७, २६६२२०८, २६६२२४९, २६६२३५८ फॅक्स : ०७२१-२६६२१३५, २६६०९४९ ग्राम : SGBAMUNI
वेबसाईट : www.sgbau.ac.in

क्र. संगाबाअवि/७-ड/११/...५३७.../१५
दिनांक : १६-०७-२०१५

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये (अनुदानित, नॅक मुल्यांकन असणारी),
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

विषय : राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत आयोजित कार्यशाळेला उपस्थित राहणे व आपले महाविद्यालयाचे प्रस्ताव पाठविणेबाबत.

संदर्भ : डॉ. मंजुषा मोळवणे, सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई तथा नोडल ऑफिसर, राज्य प्रकल्प संचालनालय (रूसा) यांचे पत्र क्रमांक Nodal Officer/RUSA/2015/17 dated 15.07.2015

महोदय,

उपरोक्त विषयासंबंधित शासनाकडून e-mail व्दारे प्राप्त झालेले पत्र सोबत जोडण्यात येत आहे. सदरील संदर्भीय पत्राचे अवलोकन करावे. राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान अंतर्गत विविध बाबींवर मार्गदर्शनपर उद्बोधन करण्याकरिता धनवटे नॅशनल कॉलेज सभागृह, धंतोली, नागपूर येथे दिनांक २० जुलै, २०१५ रोजी दुपारी २.०० वाजता कार्यशाळा आयोजित केली आहे. सदर कार्यशाळेला प्राचार्य किंवा समन्वयक, रूसा यांनी उपस्थित राहावे.

तथापि, केंद्र शासनाच्या १२ व्या व १३ व्या पंचवार्षिक योजनेतंर्गत राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) मोहीम राबविण्यासाठी विद्यापीठ तसेच संलग्नित महाविद्यालयांचा प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता मा. कुलगुरूंनी एक समिती गठीत केलेली आहे. सदर समितीच्या दि. १०.७.२०१५ रोजी झालेल्या सभेमध्ये संलग्नित महाविद्यालयांकडून केंद्र शासनाच्या रूसा योजनेतंर्गत प्रस्ताव (मार्गदर्शक तत्वाच्या पृष्ठ क्र. १, ७,८,११,१३ व १६ अंतर्गत) मागविण्यात यावे, असे ठरले.

रूसा योजनेतंर्गत प्रस्ताव डॉ. मंजुषा मोळवणे, सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई तथा नोडल ऑफिसर, राज्य प्रकल्प संचालनावय (रूसा), एलफिन्स्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१ यांचेकडे दि. २७ जुलै, २०१५ पर्यंत पाठविणे आवश्यक आहे. त्यामुळे उपलब्ध असलेला अल्प कालावधी लक्षात घेता, यासंदर्भातील प्रस्ताव त्वरित तयार करून सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई तथा नोडल ऑफिसर, राज्य प्रकल्प संचालनालय (रूसा) यांचे कार्यालयास सदर प्रस्तावाची अग्रीम प्रत विहित कालावधीत पाठविण्यात यावी. तसेच सदर प्रस्तावाच्या दोन प्रती विद्यापीठास सुध्दा पाठविण्यात याव्यात, जेणेकरून विद्यापीठाला सुद्धा आपल्या महाविद्यालयाचा प्रस्ताव अग्रेषित करता येईल.

यासंदर्भातील प्रस्ताव तयार करण्याकरिता रूसा योजनेच्या Guidelines व प्रपत्र यासोबत पाठविण्यात येत असून, आपले महाविद्यालयाचा प्रस्ताव विद्यापीठास त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

तसेच याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर upload करण्यात आली आहे.

आपला,

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती

सहपत्रे : वरिलप्रमाणे.